**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
***Online ISSN 2278-8808, SJIF 2016 = 6.17, www.srjis.com***
*UGC Approved Sr. No.49366, SEPT-OCT 2017, VOL- 4/36*

# इयत्ता आठवीच्या मराठी विषयातील पद्य विभागाचा मूल्यशिक्षण विषयक अभ्यास

**प्रा. कैलास खोंडे, Ph. D.**

***(सहाय्यक प्राध्यापक), मविप्र समाज,शिक्षणशास्त्र महाविद्यालय नाशिक***

*Email krkhonde81@gmail.com*

**Abstract**

***मानवी जीवनामध्ये मूल्यांना अनन्यसाधारण महत्व आहे , बालमनापासून जर विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्य संस्काराचे धडे दिले तर उद्याचा बलशाली भारत घडायला मदत होणार आहे ;म्हणून बालपणापासूनच विद्यार्थ्यांना संस्कार रुजविण्यासाठी पाठ्यक्रमाची मदत होते ,त्यातही कविता तर मूल्य संस्काराच्या खाणीच होत . अशा कवितांमधून प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये मूल्य कशाप्रकारे रुजविली जातात . कवितांमधून कोणकोणती मूल्ये प्रतिबिंबित होतात ,त्या मूल्यांचे प्रमाण कसे आहे , सर्वच मूल्ये प्रतिबिंबित होतात का ,असा विचार घेवून संशोधकाने प्राथमिक स्तरावरील इयत्ता आठवीच्या मराठी पाठ्यपुस्तकाच्या पद्य विभागातून कोणकोणती मूल्ये प्रतिबिंबित होतात ,त्यांचे प्रतिशत प्रमाण कसे आहे हा विचार घेवून प्रस्तुत अभ्यास केला आला .***

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

1. **प्रस्तावना** :

**सुखी समृद्ध आणि यशस्वी जीवनासाठी मूल्यशिक्षणाची गरज आहे शालेय शिक्षणात मूल्यशिक्षण हा अविभाज्य भाग आहे विद्यार्थ्यांना कोवळ्या मनावर जर नैतिक शिक्षणाचे धडे दिले तर उद्याचा नागरिक होताना त्यांची चांगली बैठक निर्माण होते त्या अनुषंगाने शालेय अभ्यासक्रम व त्यातही भाषा विषय हा महत्त्वाचा भाग ठरतो भाषा विषयातील कविता अध्यापन आतून व कवितेच्या माध्यमातून मूल्यशिक्षण चांगल्याप्रकारे रुजवता येते म्हणून प्रत्येक इयत्तेच्या कवितेच्या माध्यमातून विविध मूल्य रुजवण्याचा शासनाचा प्रयत्न असतो. म्हणून प्राथमिक स्तरावरील इयत्ता आठवीच्या मातृभाषा मराठी अभ्यासक्रमात किती कविता आहेत त्या कवितांमध्ये कोणकोणते मूल्य प्रतिबिंबित होतात कोणत्या मूल्यांना जास्त महत्त्व किंवा स्थान दिलेले आहे कोणत्या मूल्याचा विचार त्या मार्गावर झालेला नाही याचा विचार करणे संशोधकाला गरजेचे वाटले म्हणून प्रस्तुत विषयाचा अभ्यास हाती घेण्यात आला होता.**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

2. **संशोधन समस्याचे शब्दांकन**

**इयत्ता आठवीच्या मराठी विषयाच्या पद्य विभागाचा मूल्यशिक्षण विषयक अभ्यास करणे**.

3. **संशोधनाची गरज व महत्त्व**

**मानवी जीवनात मूल्यशिक्षण का महत्वाचे आहे त्याचे स्पष्टीकरण स्वामी विवेकानंद यांच्या विचारातून दिलेले आहे**.

If money is lost nothing is lost
Time is lost something is lost
If health is lost most of lost
But when character is lost everything is lost
(Swami Vivekananda)

**मातृभाषा ही हृदयाची भाषा आहे व मातृभाषेतील का वेळ इतर जीवनावर केलेले भाष्य असते असे प्रसिद्ध कवी अरनॉल्ड म्हणतात म्हणून जीवनावर केलेल्या या भाषांतून मूल्य संस्कार होणे अपरिहार्यच आहे त्या अनुषंगाने इयत्ता आठवीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकातून कोणकोणत्या कवितांचा विचार अभ्यासक्रमात केलेला आहे**, **किती कविता आहेत त्या कवितांमधून कोणकोणते मूल्य प्रतिबिंबित होतात ती मूल्य शिक्षक कशाप्रकारे विद्यार्थ्यांना दुरावतात मूल्ये रुजवण्यासाठी शिक्षक कोण कोणते उपक्रम राबवतात याचा आढावाही संशोधकाला गरजेचे वाटले कारण उद्याचा बलशाली भारत घडवायचा असेल तर आजचा बालक वर्गात बाकावर बसलेला आहे तोच खऱ्या अर्थाने उद्याचा बलशाली भारताचा बलस्थान ठरणार आहे म्हणून त्या कोवळ्या मनावर जितके कठोर नैतिक मूल्य रुजवले जातील इतक्या संवेदनशीलतेने ते मूल्य पुसले जातील तसा उद्याचा नागरिक त्यातून घटणार आहे आणि हे काम मातृभाषा मराठी त्याच्या माध्यमातून खूप चांगल्या प्रकारे होते असे संशोधकाला वाटते म्हणून शिक्षक कवितांचा मूल्य शिक्षण विषयक दृष्टिकोनातून कसा विचार करतात हे देखील संशोधकाला अभ्यासणे गरजेचे वाटले म्हणून प्रस्तुत संशोधन हाती घेण्यात आले होते**.

4.**संशोधन समस्येचे स्पष्टीकरण**

**जे जे उत्तम आणि उदात्त आहे ते ते सर्व म्हणजे मूल्य होय**. Class of good things means value ( vinobaBhave) **मानवी जीवनाचा खरा पाया मूल्यशिक्षणातून घातला जातो आणि हे मूल्य शिक्षण प्राथमिक स्तरापासून विद्यार्थ्यांना दिले जाते खास करून मातृभाषेतून ते अधिक जिवंतपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचते असा संशोधकांचा अभ्यास सांगतो त्या अनुषंगाने मातृभाषा मराठीच्या कवितांमधून कोणकोणते मूल्य प्रतिबिंबित होतात त्या मुलांचं प्रमाण कसा आहे संबंधित मुले रोखण्यासाठी शिक्षक कोणते प्रयत्न करतात त्यासाठी शाळेमध्ये कोण कोणते उपक्रम राबवतात याचा**

**अभ्यास करणे संशोधकाला गरजेचे वाटले व प्रस्तुत संशोधनातून तोच अभ्यास संशोधकाने शास्त्रीय पद्धतीने केलेला आहे.**

5. **संकल्पनात्मक व्याख्या**

**इयत्ता आठवी : महाराष्ट्रांतील शिक्षण प्रणालीच्या उच्च प्राथमिक स्तरावर ची शेवटची इयत्ता म्हणजे आठवी होय. (महाराष्ट्र राज्य शैक्षणिक, संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे)**

**पद्य :कमीत कमी शब्दात जास्तीत जास्त आशय स्पष्ट करणारे साहित्यकृती किंवा ज्यात गेयता आहे ,ती साहित्यकृती म्हणजे कविता होय. (कवी अरनॉल्ड)**

**मूल्यशिक्षण :जे उत्तम उदात्त व उन्नत आहे अशा सुसंस्काराचे शिक्षण म्हणजे मूल्यशिक्षण होय. ( विनोबा भावे )**

6. **कार्यात्मक व्याख्या :**

**इयत्ता आठवी : महाराष्ट्र राज्याच्या उच्च प्राथमिक स्तरावरील शेवटची इयत्ता म्हणजे इयत्ता आठवी होय.**

**पद्य इयत्ता आठवीच्या मातृभाषा मराठी विषयातील सर्व कविता म्हणजेच त पद्य होय**

**मूल्यशिक्षण : इयत्ता आठवीच्या मातृभाषा मराठीच्या पद्य विभागातून जे मूल्य प्रतिबिंबित होतात ,त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना दिले जाणारे शिक्षण म्हणजे मूल्यशिक्षण होय.**

7. **संशोधन प्रश्न**

**इयत्ता आठवीच्या मराठी पाठ्यपुस्तकाच्या कविता विभागातून कोणकोणते मूल्य प्रतिबिंबित होतात ?**

**इयत्ता आठवीच्या मराठी पाठ्यपुस्तकातील प्रतिबिंबित होणार या मूल्यांचे प्रमाण कसे आहे?**

**प्रस्तुत पाठ्यक्रमात मूल्यशिक्षण देण्यासाठी कोणते उपक्रम दिलेले आहेत .**

8 : **संशोधनाची उद्दिष्टे :**

1. **इयत्ता आठवीच्या मराठी विषयाच्या पाठ्यपुस्तकातील कवितांचा मूल्यांच्या दृष्टीने अभ्यास करणे.**

2. **प्रत्येक कवितेतून कोणती मूल्य किती प्रमाणात प्रतिबिंबित होतात याचा शोध घेणे.**

3. **कवितेतून मूल्य रुजविण्यासाठी पाठ्यपुस्तकात कोण कोणते उपक्रम दिले आहेत त्यांचा आढावा घेणे.**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

9.**संशोधनाचे गृहितके**

1. **चांगल्या मानवी जीवन वर्तनाचे विकास म्हणजे म्हटले होय.( विनोबा भावे )**

2. **काव्य हे जीवनावर केलेले भाष्य असते ते अंतःकरणाला जाऊन भिडते. ( कवी अर्नोल्ड)**

3. **कवितातून मूल्यसंस्कारनासाठी प्रभावी उपक्रमांचे आयोजन करता येते.**

4. **पाठ्यपुस्तकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये चांगल्या नैतिकतेचे धडे देता येतात त्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन शिक्षकांनी केले पाहिजे.**

10. **संशोधनाचे व्याप्ती मर्यादा आणि परीमर्यादा**

**संशोधनाची व्याप्ती** :

**प्रस्तुत संशोधन हे महाराष्ट्र राज्यातील मराठी माध्यमाच्या शाळांमधील मराठी विषयाच्या संबंधित आहे.**

**संशोधनाची मर्यादा** :

**प्रस्तुत संशोधन हे इयत्ता आठवीचे मराठी विषयाचे पाठ्यपुस्तकापुरते व्याप्त आहे.**

**संशोधनाची परीमर्यादा** :

**प्रस्तुत संशोधनासाठी महाराष्ट्रातील इयत्ता आठवीच्या मराठी माध्यमातील मराठी विषयाच्या पाठ्यपुस्तकाचा विचार करण्यात आलेला आहे आणि त्यातही फक्त पद्य विभागाचा मूल्यशिक्षण विषयक अभ्यास केला जाणार आहे.**

11. **संबंधित साहित्य व संशोधनाचा आढावा**

**प्रसाद सोशल साहित्याच्या आढाव्यासाठी** 12 **संदर्भ साधनांचा वापर केला. त्याचप्रमाणे पीएचडी स्तरावरील** 3 **संशोधन प्रबंध स्तरावरील संशोधन प्रबंध व स्तरावरील** 3 **संशोधन अहवाल यांचा आढावा घेण्यात आला आहे.**

12. **संशोधन पद्धती**

**प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. इयत्ता आठवीच्या मराठी विषयाच्या पाठ्यपुस्तकाचा मूल्यांच्या दृष्टिकोनातून अभ्यास करण्यात आला त्या अनुषंगाने पाठ्यपुस्तकातील सर्व कविता व त्यात प्रतिबिंबित होणारे मूल्य यांची वर्गवारी करण्यात आली. कवितेतून कोणकोणती मूल्ये प्रतिबिंबित होतात याचा अभ्यास करण्यात आला व शेवटी संबंधित मूल्यांचे प्रतिशत प्रमाण काढण्यात आले त्यासाठी शेकडेवारी हे संख्याशास्त्रीय तंत्र वापरण्यात आले.**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

13. **संशोधनाची जनसंख्या व न्यादर्श**

**जनसंख्या**

**महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण प्रणालीतील उच्च प्राथमिक स्तरावरील शेवटचा वर्ग म्हणजेच इयत्ता आठवीचे मराठी विषयाचे पाठ्यपुस्तक.**

**न्यादर्श**

**उच्च प्राथमिक स्तरावरील इयत्ता आठवीच्या मराठी माध्यमातील पाठ्यपुस्तकातील मराठी विषयाच्या पाठ्यपुस्तकातील फक्त** 8 **कवितांचा विचार प्रस्तुत संशोधनात करण्यात आला आहे.**

**नमुना निवड पद्धती** :

**प्रस्तुत संशोधनासाठी असंभाव्यतेवर आधारित नमुना पद्धतीतील सहेतुक नमुना निवड पद्धतीचा वापर केलेला आहे.**

14.**संशोधनाची साधने**

**प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक पद्धतीतील पडताळा सूची व निरीक्षण सूचीचा वापर करण्यात आलेला आहे.**

15.**संशोधनाची तंत्रे**

**प्रस्तुत संशोधनासाठी शेकडेवारी या संख्याशास्त्रीय तंत्राचा वापर करण्यात आलेला होता.**

16.**उद्दिष्टानुसार निष्कर्ष**

**उद्दिष्ट क्रमांक** 1 .**इयत्ता आठवीच्या मराठी विषयाच्या पाठ्यपुस्तकातील कवितांचा मूल्यांच्या दृष्टीने अभ्यास करणे.**

1.**स्त्री-पुरुष समानता हे मूल्य वगळता इतर सर्व मूल्ये कवितेतून कमीअधिक प्रमाणात प्रतिबिंबित झालेले आहेत.**

2. **स्त्री-पुरुष समानता हे मूल्य कोणत्याही कवितेतून प्रतिबिंबित झालेले नाही.**

3. **इयत्ता आठवीच्या पाठ्यक्रमात विज्ञान निष्ठा हे मूल्य इतर मुलांच्या तुलनेत जास्त प्रमाणात प्रतिबिंबित झाल्याचे आढळते.**

**उद्दिष्ट क्रमांक** 2 .**प्रत्येक कवितेतून कोणती मूल्ये किती प्रमाणात प्रतिबिंबित होतात याचा शोध घेणे.**

1.**इयत्ता आठवीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकात एकूण आठ कविता आहेत त्या कवितांपैकी निम्म्या कवितांमध्ये विज्ञान निष्ठा हे मूल्य प्रतिबिंबित होते.**

2. **इयत्ता आठवीच्या मराठी विषयाच्या पाठ्यक्रम श्रमप्रतिष्ठा हे मूल्य फक्त एकाच कवितेतून प्रतिबिंबित होते.**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

3.**संवेदनशीलता व सर्जनशीलता दोन्ही सारख्याच प्रमाणात प्रतिबिंबित झाल्याचे निदर्शनास येते**.

4. **सर्वधर्मसमभाव व नीटनेटकेपणा या मूल्यांचा खूपच कमी अंतर्भाव पद्य विभागात दिसून येतो शिवाय स्त्री पुरुष समानता हे मूल्य कोणत्याही कवितेतून प्रत्यक्षपणे प्रतिबंधित होतांना दिसत नाही**.

17. **मुख्य निष्कर्ष**

1.**इयत्ता आठवीच्या मराठी माध्यमाच्या मराठी पाठ्यपुस्तकाच्या पद्य भागात स्त्री पुरुष समानता या मूल्यावर आधारित एकाही कवितेला स्थान देण्यात आलेले नाही**.

2.**सर्वधर्मसमभाव या मूल्ल्याला देखील प्रस्तुत पाठ्यपुस्तकाच्या पदवी भागात कोणत्याही कवितेत प्रत्यक्षपणे स्थान दिलेले नाही**.

18. **शिफारशी**

1. **पाठ्यपुस्तक मंडळासाठी शिफारशी**

1. **पद्य विभागातील सर्व कवितांमध्ये सर्व प्रकारच्या मूल्यांना कसा स्पर्श करता येईल यासाठी प्रयत्न करावे**.

2. **पाठ्यपुस्तकाच्या माध्यमातून मूल्य शिक्षण कसे द्यावे या पार्श्वभूमीवर मंडळाने स्वतंत्र मूल्यशिक्षण विषयक शिक्षक हस्तपुस्तिका तयार करावी**.

**संदर्भ**:

**मराठी भाषेतील संदर्भ**

**पुस्तके**

*आगलावे, प्र. (2000 ) संशोधन पद्धती, शास्त्र व तंत्र ,नागपूर : विद्या प्रकाशन.*
*अवघडे, रे. (2009) भारतीय शिक्षण, अंक 7, जुलै : पृष्ठ क्रमांक 38 ते 41.*
*कदम, चा. प. ( 1994) शैक्षणिक संख्याशास्त्र , पुणे : नूतन प्रकाशन*
*दूनाखे, अरविंद. (2005) प्रगत शैक्षणिक तत्वज्ञान, पुणे : नित्य नूतन प्रकाशन*
*देशपांडे , वसंत . व महाले, संजीवनी . (2008) अध्यापन आणि अध्यापक शिक्षण, नाशिक : शिक्षक प्रशिक्षण प्रकाशन*
*बोरसे , चंद्रकांत. व दौंड, गोरख. (2009) अनुदेशन प्रणाली , नाशिक : नेहा प्रकाशन प्रथमावृत्ती*
*भिंताडे, वि.रा. ( 2008) शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे : नित्य नूतन प्रकाशन*
*करंदीकर, सुरेश (1998) मूल्यशिक्षण : फडके प्रकाशन, कोल्हापूर*
*मुळे, रा. व. उमाठे, वि. तु. (1998) शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे :औरंगाबाद विद्या बुक्स.*
*ठोंबरे, विद्या. (1997) नीतिमूल्य व शिक्षण : नूतन प्रकाशन, पुणे*
*देवस्कर, विजय .(1998) मूल्य शिक्षण काळाची गरज, मूल्यांचे शिक्षण: शिक्षकांसाठी हस्तपुस्तिका : पुणे: महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद , पुणे*

**इंग्रजी भाषेतील संदर्भ** :

*Garrett H E (2005 )Statistics in Psychology and Education, New Delhi: Paragon international*
*Best ,J .W. and Kahn, J.V. (1998 )Research in Education New Delhi : Prentice Hall Delhi.*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*